# चांदणी

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**चांदणी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# चांदणी

# १

खरं म्हणजे चिंतामणीला आता झोप येऊ लागली होती. खास वाढदिवसासाठी शिवलेला कोरा सूट त्यानं पाच वाजल्यापासून अंगावर चढविला होता, तो चुरमळू नये म्हणून अवघडून बसण्याचा आता त्याला कंटाळा आला होता. त्याला ओवाळण्यासाठी त्याच्या आईनं बोलावलेल्या बायकांची त्याच्या आईशी बोलणी चालली होती त्याकडे लक्ष देणं त्याला आता नकोसं वाटू लागलं होतं. त्याची मैत्रीण रोहिणी एका पुस्तकातलं एक गणिताचं कोडं कसं सोडविता येण्यासारखं होतं ते त्याला सांगत होती, परंतु तिच्या बोलण्याकडे लक्ष द्यावंसं त्याला वाटत नव्हतं... त्याचं शरीर आंबलं होतं. डोळ्यांच्या पापण्या जड झाल्या होत्या. कोचाच्या पाठीला रेलून बसल्याबसल्या झोपेच्या कुशीत शिरण्यात त्याला फार सुख होत होतं. मात्र त्या सुखदायक गुंगीचा अनुभव घेता घेता काहीशा रुष्ट स्वरात तो मनाशी तक्रार करीत होता, 'आमच्या काकांचं सदा हे असंच! कधी वेळेवर यायचे नाहीत! येतो म्हणून कबूल करतील आणि खुशाल जातील निघून कामाला!'

चिंतामणीची ही तक्रार काही खोटी नव्हती....आज चिंतामणीला तेरा वर्षं पूर्ण होऊन चवदावं वर्ष लागलं होतं. त्याच्या वाढदिवसानिमित्त दुपारी जेवणाचा थाटबाज बेत झाला होता. त्याचे सात-आठ सवंगडी आणि काही मोठी मंडळी जेवायला आली होती. गप्पा, गोष्टी, विनोद, खेळ अशा कार्यक्रमात चार घटका सगळ्यांनीच आनंदात घालविल्या होत्या. नंतर काकासाहेब कचेरीत गेले होते तेव्हा मालतीबाईंनी-चिंतामणीच्या आईनं-त्यांना बजावलं होतं, ''संध्याकाळी पाच वाजता

चिंतामणीला ओवाळणार आहोत. चार सुवासिनी मी बोलावल्या आहेत. तुम्ही हजर असायला हवं.'' वेळेवर येण्याचं काकासाहेबांनी कबूल केलं होतं. परंतु आता रात्रीचे आठ वाजण्याचा सुमार झाला होता, तरीदेखील ते आले नव्हते....झोपेच्या कुशीत शिरता शिरता चिंतामणी नाराजीनं स्वतःशी म्हणत होता, ''आमच्या काकाचं सदा हे असंच!''

''आमच्या काकाचं सदा हे असंच!'' असा उद्गार चिंतामणी पाच-सहा वर्षांचा लहान होता तेव्हा देखील वारंवार काढीत असे. मात्र निराळ्या संदर्भात. त्या वेळेस काकासाहेब साधे फौजदार होते आणि लहान शहरात होते. पण त्या लहान शहरातदेखील सिनेमाची दोन थिएटरं होती; आणि नाटक कंपन्यांची नाटकं अधूनमधून होत होती. आपले वडील फौजदार आहेत, तेव्हा आपल्याला हवी तेवढी नाटकं आणि सिनेमाचे खेळ फुकट बघायला मिळावे असं चिंतामणीला वाटे. नाटक कंपनी मुक्कामाला आली की तिची मालक मंडळी काकासाहेब कान्हेऱ्यांच्या घरी मुद्दाम येत, आणि नाटक बघण्यासाठी सहकुटुंब सहपरिवार येण्याची विनंती करीत. 'कंपनी आपल्या घरची आहे. आमचा मुक्काम इथे आहे तोपर्यंत कोणत्याही खेळाला आपण यावं. निदान बाईसाहेबांना आणि धाकट्या साहेबांना पाठविण्याचं करावं!' असं कायमचं आमंत्रण देऊन ठेवीत. पोलीस खात्यातल्या अधिकाऱ्यांनी नाटकं सिनेमे हवे तेवढे फुकट बघायचे, तो त्यांचा हक्क आहे. त्यांना हवे तेवढे फुकट पास देण्याच्या बाबतीत नाटकवाल्यांनी किंवा सिनेमावाल्यांनी खळबळ केली तर त्यांचा निभाव लागत नाही, असा अलिखित संकेत सर्वमान्य होता. परंतु काकासाहेब कान्हेरे नाटकाला किंवा सिनेमाला कधीदेखील फुकट जात नसत; आणि निस्पृहपणाच्या त्यांच्या कटाक्षामुळे त्यांच्या हाताखालच्या पोलिस अधिकाऱ्यांनादेखील फुकटेगिरी करता येत नसे. ती माणसं काकासाहेबांवर याबाबतीत नाराजच होती. कुणी आपली नाराजी बोलून दाखवीत नसत, परंतु ती माणसं आपापसात असंच म्हणत की असा मुलखावेगळा निःस्पृहपणा कधी बघितला नव्हता... मालतीबाई कधी कधी काकासाहेबांना हळूच म्हणून बघत की, ''एखाद्या नाटकाला गेलं म्हणून काय बिघडतं?''...काकासाहेब त्यांना उत्तर देत, ''तिकिटं काढावी आणि जावं. कुणाचेही थोडे जरी उपकार आपण घेतले तरी आपणाकडे मिंधेपणा येतो, भीड निर्माण होते, आणि मग त्खया लोकांनी एखादा गुन्हा केला तरी दोस्तीखातर काणाडोळा करण्याची



पाळी येते.''... मिठाईची करंडी, आंब्यांची टोकरी अशा भेटी कुणाकडूनही कधी स्वीकारायच्या नाहीत असाही काकासाहेबांचा कटाक्ष होता. एखाद्या पानमळेवाल्यानं पिकल्या पानांचा पुडा आणून दिला तरी काकासाहेब त्याला तो परत घ्यायला लावीत आणि म्हणत, ''माफ करा. रागावू नका. परंतु अशा भेटी कुणाकडून कधी घ्यायच्या नाहीत असं मी ठरविलं आहे. ज्या दिवशी पोलिस खात्याच्या या नोकरीत मी शिरलो त्या दिवशी मनोमन शपथ घेतली आहे.''... मालतीबाईंना मनातल्या मनात वाटत असे, प्रामाणिकपणाचा आणि नेकीचा हा अतिरेक आहे. परंतु त्या काकासाहेबांशी वाद घालीत नसत. आपला लौकिक निर्मळ राखण्याच्या नवऱ्याच्या कटाक्षाबद्दल त्यांना आदर आणि अभिमानच वाटत असे...आपले वडील कोणत्या तत्त्वासाठी कसे वागतात याबद्दलचा समज पाचसहा वर्षांच्या चिंतामणीला कोठून असणार? त्याला एवढंच कळत होतं की फौजदाराचा मुलगा या नात्यानं नाटक सिनेमा फुकट पाहण्याची मिजास आपल्याला करता यावी, आणि ती करता येत नाही म्हणून तो आपल्या बापावर नाराज असे. 'आमच्या काकांचं म्हणजे सदा हे असंच!' असा उद्गार तो वारंवार आईजवळ काढीत असे.

परंतु त्याची बापाबद्दलची ही तक्रार लहान वयातली होती. तो मोठा होऊ लागला, त्याचा समज वाढू लागला तेव्हा बापाच्या वर्तनामागची तत्त्वं त्याला समजू लागली होती आणि सिनेमा-नाटकं फुकट बघायची नाहीत, कुणाकडून कसलीही भेट घ्यायची नाही, असा काकासाहेबांनी जो कटाक्ष ठेवला होता त्याबद्दलची त्याची तक्रार नाहीशी झाली होती. जो लाचलुचपत कधी घेणार नाही, जो गुन्हेगाराला कधी देखील क्षमा करणार नाही, जो सदा न्यायानंच वागेल, जो आपल्या कर्तव्यात कधी कसूर करणार नाही, असा अत्यंत प्रामाणिक आणि कडक अधिकारी म्हणून आपल्या बापाचा लौकिक असावा याचा त्याला अभिमान वाटू लागला होता. बापावर त्याची फार भक्ती होती. बाप आपले वावगे लाड कधी करणार नाही, परंतु बापाचं आपल्यावर फार प्रेम आहे हे त्याला कळू लागलं होतं... तो सहा वर्षांचा असताना एकदा एका कॉन्स्टेबलबरोबर गेला होता आणि गावातल्या एका हलवायाच्या दुकानातून मिठाई आणि चिवडा फुकट खाऊन आला होता. काकासाहेबांना ही गोष्ट कळली तेव्हा त्यांनी त्याला आणि त्या कॉन्स्टेबललाही छडीनं फोडून काढलं होतं. त्या वेळेस त्याला काकासाहेबांचा इतका राग आला

होता की त्यानं आठ दिवस त्यांच्याशी बोलणं टाकलं होतं. असला कसला कठीण ह्यदयाचा बाप, असं त्याच्या मनात आलं होतं. घरातून निघून जाण्याचा देखील विचार त्यानं केला होता. परंतु त्या प्रसंगाची आता त्याला आठवण झाली की तो मनाशी म्हणे, ''काकांनी मला मारलं तेच बरोबर होतं. माझ्या कल्याणाचं होतं. त्यांच्या लौकिकाला उणेपणा येईल असं वर्तन माझ्याकडून होता कामा नये...'' त्याच्या वात्सल्याबद्दल त्याला शंका वाटेनाशी झाली होती.

नाटक-सिनेमा फुकट बघण्याची गोष्ट सोडली तर चिंतामणीचे लाड काही थोडे होत नव्हते. डी. एस. पी. म्हणून पुण्याला येण्यापूर्वी काकासाहेबांची नोकरी जिथे जिथे झाली होती त्या त्या ठिकाणाच्या मुक्कामातले चिंतामणीचे दिवस मोठ्या मजेतच गेले होते. आपल्या खात्याच्या नोकरांचं स्नेहसंमेलन काकासाहेब मोठ्या थाटानं प्रतिवर्षी भरवीत असत. मर्दानी खेळांचे सामने, शर्यती, कुस्त्या अशी मोठी दंगल भरविण्यात येई. तिच्यासाठी सबंध जिल्ह्यातले पोलिस खेळाडू जमा होत असत. बक्षीससमारंभ होत असे. शाहिरी पोवाड्यांचा कार्यक्रम होत असे. एक नाट्यप्रयोगदेखील होत असे. या सर्व कार्यक्रमांच्या वेळेस काकासाहेबांचा एकुलता एक मुलगा म्हणून अगदी पुढच्या खुर्चीवरील मानाची जागा चिंतामणीला मिळत असे. सुटा-बुटाचा थाट करून आईशेजारी बसण्यात, किंवा काकासाहेबांबरोबर इकडे तिकडे हिंडण्यात त्याला केवढा मोठेपणा वाटत असे! संमेलनाच्या व्यवस्थापक कमिटीच्या सभासदांसाठी बनविलेला साटणीचा रंगीबेरंगी बॅज कुणीतरी कौतुकानं त्याच्या छातीवर लावावा, आणि मग केवळ तो बॅज साऱ्या लोकांना दिसावा म्हणून त्यानं इकडे तिकडे फेऱ्या घालाव्या...असं करताना त्याच्या मनात येई, काकांचा मुलगा असण्यात केवढी मजा आहे!

एकदा काकासाहेब कुणा दोस्ताबरोबर शिकारीला गेले असताना त्यांना वाघाचा चार दिवसांचा बच्चा सापडला होता. त्याला दुध कुणाचं पाजायचं असा मोठा प्रश्न पडला होता. परंतु त्याच सुमारास चिंतामणीच्या हौसेखातर पाळलेली कुत्री व्याली होती. तिनं आपल्या पिलांबरोबर त्या वाघाच्या बच्चालाही पिऊ दिलं होतं. साऱ्या गावात तो एक कुतूहलाचा विषय झाला होता. कुत्रीला पिणारा आणि कुत्र्याच्या पिलांत खेळणारा वाघाचा बच्चा बघण्यासाठी गावातले लोक काकासाहेबांच्या घरी येऊ लागले होते. त्यांना तो वाघाचा बच्चा दाखविण्यात



आणि 'आम्ही त्याचं नाव राजा ठेवलंय' असं सांगण्यात चिंतामणीला केवढी धन्यता वाटत असे!.....पुढे तो राजा वाढू लागला तेव्हा त्याला घरात ठेवणं सुरक्षितपणाचं वाटेनासं झालं. गावात मुक्कामासाठी आलेल्या सर्कसचे मॅनेजर काकासाहेबांचे लहानपणाचे दोस्तच निघाले. त्यांनी तो बच्चा नेला. राजाचं राज्य औट घटकेचंच ठरलं. परंतु राजाच्या अनेक गमतीची आठवण मात्र कायमची राहिली...

काकासाहेबांच्या तैनातीला प्रत्येक गावी एखादा ऑर्डर्ली असे. अशा ऑर्डर्लींपैकी एक चिंतामणीला फार आवडला होता आणि केव्हाही लहानपणाचे दिवस तो आठवू लागला की त्याची याद त्याला हटकून येत असे. त्याचं नाव होतं गोपाल नायडू त्याला सर्वजण म्हणत असत गोपी! वर्णानं काळा मिट्ट, तोंडावर देवीचे व्रण असलेला, आणि फाटक्या अंगाचा गोपी मोठा गमत्या आणि हरहुन्नरी होता. तो जादूचे खेळ काय करून दाखवायचा, एखाद्या बहुरूप्याप्रमाणे जनावरांचे, पक्ष्यांचे आवाज काय काढायचा, आणि साऱ्यांच्या नकला काय हुबेहूब करून दाखवायचा. एकदा काकासाहेब फिरतीवर परगावी गेले असताना मालतीबाईंनी रात्री आपल्या मैत्रिणींची बैठक भरविली होती आणि गोपी नायडूच्या नकला चालल्या होत्या. मधेच त्यानं मालतीबाईंना विचारलं, ''आपल्या साहेबांची नक्कल करून दाखवू काय आईसाहेब?''...मालतीबाईंनी आश्चर्यानं विचारलं, ''कुणाची? यांची नक्कल करतोस तू?''... गोपी म्हणाला, ''करतो म्हणजे काय आईसाहेब, एकदा बघा तरी.'' आणि काकासाहेब कचेरीत बसलेले आहेत, एका प्रकरणातल्या चुकीबद्दल दोन कॉन्स्टेबलांना फैलावर घेत आहेत, कारकुनाची खरडपट्टी काढीत आहेत, अशा थाटाचा प्रसंग साऱ्यांचे वेगवेगळे आवाज काढून गोपीनं साभिनय करून दाखविला. तेव्हा साऱ्या बायकांची हसता हसता मुरकुंडी वळली होती. मालतीबाईंनी गोपीला शाबासकी देण्यासाठी कौतुकाचा उद्गार काढला, ''हात मेल्या!'' गोपीनं दोन्ही हात जोडून त्यांना म्हटलं होतं, ''पण मी नक्कल करतो ही गोष्ट साहेबांच्या कानावर जाता कामा नये बरं का आईसाहेब! साहेबांना समजलं तर मला छडीखाली फोडूनच काढतील''... परंतु काकासाहेबांना ही गोष्ट सांगितल्यावाचून चिंतामणीला राहवलं नव्हतं, आणि काकासाहेब रागावले तर नव्हतेच, परंतु त्यांनी गोपीकडून मुद्दाम नक्कल करवून घेतली होती आणि खूष होऊन त्याला बक्षीस दिलं होतं. त्या वर्षीच्या स्नेहसंमेलनात त्यांनी गोपीचा कार्यक्रम

करविला होता, आणि त्या कार्यक्रमात आपली नक्कल त्याच्याकडून करवून घेतली होती. साऱ्या श्रोत्यांनी आणि बड्या बड्या अधिकाऱ्यांनी गोपीची वाहवा केली होती.....

आणि असा हा सदा आनंदी असलेला, गमत्या, कसबी, अश्राप, इमानी गोपी एके दिवशी सकाळी अकस्मात डोकं फिरल्यासारखा वागू लागला होता. नित्याप्रमाणे कामाला लागण्याऐवजी एक मोठी चादर बुरखा घेतल्याप्रमाणे डोक्यावरून पायघोळ घेऊन मधल्या घरातल्या कोपऱ्यात उभा राहून तो अंगात आल्याप्रमाणे घुमू लागला होता. आणि जो कोणी जवळ जाईल त्याला तो म्हणत होता, 'मी भूत आहे! मी समंध आहे!' त्याला छडीचा मार देऊन ताळ्यावर आणण्याचा काकासाहेबांचा प्रयत्न व्यर्थ गेला होता. त्याला खचित वेड लागलं होतं. पहिले दोन दिवस तो फक्त कोपऱ्यात उभं राहून 'मी भूत आहे, मी समंध आहे' असं ओरडत होता-परंतु मग तो दंगामस्ती करू लागला होता. काकासाहेबांनी त्याची रवानगी वेड्याच्या इस्पितळात केली होती. त्याचे हात-पाय बांधून त्याला पोलिस व्हॅनमध्ये चार कॉन्सटेबलांनी कोंबला तेव्हा ते सारं बघून चिंतामणी ओक्साबोक्शी रडला होता, 'गोपी! गोपी!' असा हंबरडा त्यानं फोडला होता...

ज्या दिवशी गोपीला वेड्याच्या इस्पितळात धाडण्याचा प्रसंग घडला, त्यानंतर आठच दिवसांनी चिंतामणीचा वाढदिवस होता. चिंतामणी आईला म्हणाला, ''काही करू नकोस या वेळेस. कुणाला बोलावू नकोस.'' मालतीबाईंनी त्याच्या मित्रांना बोलावण्याचा बेत सोडून दिला, परंतु गोडधोड केल्यावाचून त्यांच्यानं राहवलं नाही. पण चिंतामणीनं जेवणाला हात देखील लावला नाही. गोपीच्या आठवणी काढून तो सारखा अश्रू ढाळीत होता.

नंतरच्या वर्षातही वाढदिवस आला की चिंतामणीनं गोपीच्या आठवणी काढाव्या, आणि पुन्हा पुन्हा म्हणावं, ''गोपी असायला हवा होता गं आई!'' मालतीबाईंनी 'होय रे' असं म्हणावं आणि डोळे पुसावे. त्यांना आठवण येई की गोपी नेहमी म्हणायचा, ''आईसाहेब, साहेबांची बदली होऊन तुम्ही हे गाव सोडून निघालात की मी तुमच्याबरोबर येणार बरं का. खात्यातली नोकरी सोडून देणार मी, आणि तुम्ही जाल तिकडे येणार. मला ना घर-दार, ना आई-बाप, ना बायका-पोरं. आता साहेबांच्या पायाची चाकरी करणार मी मरेपर्यंत. मला अंतर देऊ नका.''



त्यांनीही गोपीला आश्वासन द्यावं, 'अरे, तुला बरोबर घेतल्याशिवाय जाणार नाही आम्ही.' परंतु बिचाऱ्या गोपीच्या दुर्दैवानं अंतर निर्माण केलं होतं. त्याची सोबत संपली होती.....

आज चिंतामणीचा तेरावा वाढदिवस होता. आणि गोपीच्या आठवणी घरात विशेष निघाव्यात असं एक नवंच कारण घडलं होतं....नोकरी बजावताना दाखविलेल्या स्पृहणीय शौर्याबद्दल राष्ट्रपतीपदक काकासाहेबांना मिळालं होतं. त्याबद्दलचा समारंभ दिल्लीस होणार होता. त्याच सुमारास सर्व राज्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची एक परिषदही दिल्लीस भरावयाची होती. काकासाहेबांचा दिल्लीत चार दिवस मुक्काम होणार होता. मालतीबाईंना आणि चिंतामणीला आपल्या बरोबर घेऊन जाण्याचं त्यांनी ठरविलं होतं. त्यामुळे गेले चार दिवस वाढदिवसाच्या तयारीप्रमाणेच प्रवासाच्या तयारीचीही गडबड घरात उडाली होती....चिंतामणीनं वारंवार उद्‌गार काढला होता, ''गोपी असता तर आपण त्याला दिल्लीला नेला असता नाही काका?''

एका मासिकातलं गणिताचं कोडं तसं सोडविता येण्यासारखं होतं त्याबद्दल रोहिणी काहीसं बोलत होती, परंतु त्याकडे चिंतामणीचं धड लक्ष नव्हतं. त्याचं अंग अवघडलं होतं. आंबलं होतं. त्याचे डोळे जड झाले होते, मिटत होते. त्या सुखदायक गुंगीत शिरता शिरता त्याला होत होत्या गोपीच्या आठवणी. आणि त्या आठवणीत मधूनमधून मिसळत होत्या दिल्लीच्या प्रवासात काय काय मजा करता येणार याबद्दल गेल्या चार-सहा दिवसांत घरात वरचेवर ज्या गोष्टी बोलल्या गेल्या होत्या त्या गोष्टी....

पुण्यात डी. एस. पी. म्हणून नेमणूक झाल्यापासून ज्या बंगल्यात काकासाहेब राहू लागले होते, त्याच्या शेजारीच बाळशास्त्री रानडे राहत असत. बाळशास्त्री रानड्यांच्या पत्नीची आणि मालतीबाईंची जुनी ओळख निघाल्यामुळे त्या दोन कुटुंबात घरोबा निर्माण झाला. बाळशास्त्रींना एकच अपत्य होतं; रोहिणी नावाची बारा वर्षांची मुलगी. इतर मुलींप्रमाणेच ती हायस्कुलात जात होती, परंतु बाळशास्त्रींनी तिला संस्कृत विद्येत प्रवीण केली होती. चिंतामणी आणि रोहिणी यांची गट्टी जमायला उशीर लागला नव्हता. दोघं एकमेकांच्या घरी जाऊ येऊ लागली होती. एके दिवशी चिंतामणीनं काकासोबांना विचारलं होतं, ''शास्त्रीबुवा म्हणतात मी तुला संस्कृत शिकवीन. शिकू?'' काकासाहेब म्हणाले, ''अवश्य शीक.'' चिंतामणीचं